RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 March, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 March, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : नऊवा | मार्च २०१७



सतगुरू मला संतोष चिकाटी व धैर्य दे (सत्संग) 5

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 19

सातत्य सतगुरूंच्या आठवणींचे (संदेश) 29

जेव्हा महाराज कृपालजींनी मला... (संदेश) 31

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



सतगुरू मला संतोष चिकाटी व धैर्य दे

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, महात्मा दादू दयालजींची वाणी
कॅलिफोर्निया, अमेरिका – ७ मे, १९८५

सानूं भुल्लयां नूं रस्ते पाया, धन कृपाल गुरु जी,

१. *जप–तप कीते धूणे तपाऐ, जल धारे करके तीर्थ न्हाऐ,*
औजड़ जांदेयां नूं रस्ते पाया, धन कृपाल गुरु जी...

२. *कर्मकांड सब कर–कर हारे, भेष वटाऐ न्यारे–न्यारे,*
तैथों बिना किसे दु:ख ना वंडाया, धन कृपाल गुरु जी...

३. *कोई ना जग विस रेहा सहारा, कित्थों लब्भ जाऐ प्रीतम प्यारा,*
आखिर तरस पीया नूं आया, धन कृपाल गुरु जी...

४. *अंदर जावां बाहर आवां, नूर इलाही देखना चाहवां,*
भाग तत्तड़ी दे घर नूं लाया, धन कृपाल गुरु जी...

५. *बिरहों दा दु:खड़ा वड–वड खावे, 'अजायब' दी कोई पेश ना जावे,*
वैद्य बण कृपाल घर आया, धन कृपाल गुरु जी...

या भजनातील प्रत्येक ओळीचा संदर्भ माझ्या जीवनाशी निगडीत आहे. जेव्हा आपल्या अंत:करणातून अशा प्रकारच्या विरहजन्य हाका बाहेर पडू लागतात, तेव्हा अशा प्रकारच्या विरहात तळमळत असलेल्या व्यक्तीसमोर तुम्ही या जगातील कोणतीही वस्तू ठेवलीत, तरीही तो आनंदीत होत नाही. जसे आईच्या प्रेमासाठी रूदन करीत असलेल्या मुलासमोर तुम्ही कितीही निरनिराळ्या प्रकारची खेळणी ठेवलीत, कितीही चवदार अन्नपदार्थ किंवा आकर्षक वस्तू ठेवल्यात, तरीही ते मुल आईने कडेवर घेऊन प्रेम केल्याशिवाय शांत होऊ शकत नाही. जेव्हा एखाद्या आत्म्याच्या अंत:करणात परमात्म्याच्या मिलनाची तळमळ निर्माण होते, तेव्हा जोपर्यंत परमात्मा त्यास प्राप्त होत

नाही, तोपर्यंत तो आत्मा शांत होत नाही. आपल्या आत्म्याने परमात्म्यास घातलेली साद, त्याचा विरहाग्नी आणि त्याची तळमळ जर खरी असेल, तर परमात्मा न बोलविताच आपल्या समोर येतो.



परमपिता परमात्मा कृपाल म्हणत असत, ''मनुष्यासाठी परमात्म्यास प्राप्त करणे इतके अवघड नाही, जितके मनुष्य बनने अवघड आहे.'' जेव्हा त्यांच्या विरहामध्ये त्यांचा हा प्रेमबद्ध रुग्ण तळमळत होता, तेव्हा महाराज कृपाल जे विरहाचे वैद्य होते, त्यांनी येऊन प्रेमाचे औषध दिले व या रुग्णाचा आजार बरा केला.

आजपासून तीस वर्षांपूर्वी राजस्थानात दुष्काळ पडणे नेहमीचेच होते. त्याकाळी आजसारखी पाण्याच्या कालव्यांची व्यवस्था नव्हती. राजस्थानातील जीवनमान पूर्वी अतिशय खडतर होते. हल्ली-हल्ली पाण्याचे कालवे तयार केले गेल्याने आता बऱ्याच सुखसोई उपलब्ध झाल्या आहेत.

त्याकाळी एका गावात दुष्काळ पडला. दुष्काळाने बेजार होऊन गावकरी गाव सोडून निघून गेले. त्या गावातील एका गृहस्थाने स्वत:च्या पत्नीस

त्याची बहीण बनवून विकून टाकले. त्याला वाटले, जर तिला पत्नी म्हणून विकण्याचे ठरविले, तर कोणीही तिला विकत घेणार नाही. त्या पैशांनी त्याने स्वत:च्या गरजांची आपूर्ती केली. भूक आणि गरीबी मनुष्यास कोणतेही निकृष्ट प्रतीचे काम करण्यास भाग पाडते!

काही दिवसांनंतर तेथे पाऊस पडण्यास सुरूवात झाली. तेव्हा ती स्त्री परमात्म्याच्या आणि ढगांच्या दिशेने हात जोडून प्रार्थना करू लागली, 'तू येथे पड वा पडू नकोस, परंतु तेथे जाऊन नक्की पड, जेथे एका मनुष्याने स्वपत्नीस बहीण बनवून तिची विक्री केली आहे.''

माझ्या अंत:करणातदेखील अशाच प्रकारचे विरहाचे दु:ख व तळमळीची हाक निर्माण होत होती. माझा विचार असे की परमात्म्यास प्राप्त करण्यासाठी केलेला मोठ्यात–मोठा त्यागदेखील नगण्यच असतो. कबीर साहेब सांगतात, ''तुम्ही जर जखमी असाल तर आणखी जखमा करून घेण्यास तुम्ही राजी होत नाही कारण अगोदर झालेल्या जखमांनीच होत असलेल्या वेदना असहनीय असतात.'' परमात्म्याने तुम्हांस या जगातील सर्वप्रकारच्या सुखसोई दिलेल्या असताना, तुम्ही त्यांचा त्याग करून दाखविलात तरच खरे शौर्य आहे.

भर जवानी कोई शीलवंत विरला होय सो होय।

ऐन तारुण्यात एखादा वीर पुरुषच स्वत:च्या शीलाचे रक्षण करून ठेवतो. करोडो लोकांमध्ये असा एखादा दुर्लभ मनुष्यच आपणांस सापडेल. आपण आपले आयुष्य बालपणीच अशुद्ध करून टाकतो. कबीर साहेब सांगतात, ''तुम्हाला जप–तप करणारे, शूर–वीर आणि दानशूर अनेकजण सापडतील परंतु शीलवंत पुरुष लाखो लोकांमध्ये एखादा दुर्लभच सापडेल, ज्याने स्वत:च्या जीवनाचे पावित्र्य राखले असेल. शिक्षण घेणे तसेच इतर सर्व कामं करणे सोपे आहे, परंतु अध्यात्म्यामध्ये उच्च पातळीस पोहचणे, कामास वश करणे, शीलाचा सांभाळ करणे अतिशय अवघड आहे.''

महात्मा आपणांस सांगतात की आपण कामेंद्रियांचे गुलाम बनुन स्वत:च्या प्रकृतीचा सत्यानाश करून घेतो. कामाग्नी मनुष्याद्वारे पशूसमान विषयभोगांचे

कृत्य करवून घेतो, त्यांना जनावरच बनवून टाकतो. कामाग्नी आत्म्याच्या सर्व सद्‌गुणांचा नाश करून टाकतो. अशा प्रकारे आपण आपल्या प्रकृतीचा सत्यानाश करून आयुष्यभर पश्चाताप करीत राहतो. कामी मनुष्य निर्लज्ज असतो, कारण त्यास शेजारी उभा असलेला मनुष्यदेखील दिसत नाही.

अशीच अवस्था क्रोधाची आहे, कारण क्रोधही मनुष्याच्या शांततेचा भंग करून टाकतो. क्रोधाग्नी अतिशय घातक आहे, कारण मनुष्याच्या अंतरातूनच हा अग्नी निर्माण होतो आणि मनुष्यांचाच विध्वंस करतो. क्रोध मनुष्याच्या अवमानतेचे कारण बनतो, त्याच्या सर्व सद्‌गुणांचा नाश करतो. जेव्हा क्रोधी मनुष्यास क्रोधाचा आवेग येतो तेव्हा तो चांगल्या-वाईटाची पारखदेखील करू शकत नाही. क्रोधी स्वत: अशांत असतो व तो आपल्या जवळपासच्या लोकांस देखील अशांत करतो. संतांनी क्रोधी मनुष्यास चांडाळ असे संबोधलेले आहे. क्रोध मनुष्याची दृष्टी अंधुक करून टाकतो.

लोभी मनुष्याची अवस्था, असंवेदनशील मांसाच्या तुकड्याहून निराळी नसते. लोभी व्यक्तीच्या तृष्णेला अंतच नसतो. वाळवंटात मृगजळामागे पळणाऱ्या हरीणाप्रमाणे लोभी मनुष्य जगभर धावपळ करीत राहतो. महाराज सावन सिंहजी सांगत असत. ''जो मनुष्य सर्वांत धनवान आहे, खरे म्हणजे तोच मनुष्य सर्वांमध्ये अधिक कंगाल आहे.'' गुरू नानक देवजीदेखील असेच वर्णन करत आहेत:

लोभी दा वसाह न कीजे जेका पार वसाए।
अंत काल तित्थे ढोहे जित्थे हत्थ न पाए।।

मोह आपली नेहमीच फसवणूक करीत असतो. या जगामध्ये आपण रिकाम्या हाती येतो व या जगातून रिक्त हातांनीच जाणार आहोत.

हिंदुस्थानात औरंगजेब नामक अतिशय शक्तीशाली राजा होऊन गेला. त्याने अनेक साधु-संतांचा छळ केला, स्वत:च्या कौटुंबियांचादेखील छळ केला, स्वत:च्या वडिलांनाही तुरुंगामध्ये ठेवले. स्वत:च्या भावाचा शिरच्छेद

करून त्याने सत्ता बळकावली होती. औरंगजेबानेच दिल्ली येथे जाहीररीत्या गुरू तेगबहादुर साहेबांचा शिरच्छेद केला होता. तो सुन्नी मुसलमान होता. मुस्लीम धर्मप्रसारासाठी त्याने सर्व मार्गांचा अवलंब केला. लोकांना धर्मपरिवर्तन करण्यासाठी त्यांना आमिषे दाखविली तसेच भीतीचाही वापर केला.

आयुष्याच्या अखेरीस मृत्युच्या काही दिवस अगोदर त्याने स्वहस्ते एक मृत्युपत्र लिहिले. त्या मृत्यूपत्रामध्ये त्याने लिहिले की मी हिंदुस्थानाचा भलेही राजा होतो, सत्ताधिश होतो, परंतु यावेळी माझा आत्मा माझा धिक्कार करीत आहे की तू जीवनामध्ये सत्कर्मे केली नाहीस. पुढे आत्मा असेही धिक्कारीत आहे की आता पश्चाताप करून काय उपयोग?

औरंगजेबाने स्वत:च्या मृत्यूपत्रामध्ये नोंदले आहे की मोकळ्या वेळात मी कुराण लिहित असे, ज्यातून कमावलेल्या पैशांमधून बचत केलेले चार रुपये दोन आणे माझा नोकर आया बेग याच्याकडे जमा केलेले आहेत. माझ्या मृत्यूनंतर त्याच पैशांमधून खादीचे कफन विकत आणून माझ्यावर अच्छादित करावे. मला दफन करताना माझा पुत्र आझमनेच हात लावावा. माझी कबर घनदाट जंगलामध्ये अशा ठिकाणी खोदावी, ज्या ठिकाणावर वृक्षछाया पडणार नाही, कारण गुन्हेगार मनुष्य कोणत्याही छत्रछायेचा अधिकारी नसतो. ज्या मार्गावरून माझा जनाजा नेला जाईल, त्या मार्गावर अंथरण्यासाठी चांगल्या तलम वस्त्रांचा वापर केला जाऊ नये. माझ्या मरणोपरांत कोणत्याही प्रकारचे साज-संगीत गायले जाऊ नये, कारण मला संगीताचा तिरस्कार आहे. माझे पार्थिव शरीर दफन करते वेळी माझा चेहरा उघडा ठेवला जावा, कारण मी असे ऐकले आहे की उघड्या माथ्याने अल्लाह-तालाच्या दरबारात गेल्यास कदाचित माफी दिली जाते. माझी कबर संस्मरणीय प्रकारची केली जाऊ नये. जर काही करावयाचे असेल, तर कच्च्या विटांचा वापर करून चबुतरा बनविला जावा. आजही दक्षिण भारतात औरंगाबाद येथे कच्च्या विटांनी बनविलेला चबुतरा उध्वस्त अवस्थेत पडलेला आहे.

औरंगजेबने अखेरीस मृत्युपत्रामध्ये असे लिहिले की जगामध्ये सर्वांत दुर्दैवी मनुष्य कुणी असेल, तर तो राजाच असतो. मी अल्लाह–ताला समोर प्रार्थना करतो की त्याने कुणालाही राजा बनवू नये. तुम्ही विचार करून पहा, इतक्या मोठ्या प्रदेशाचा राजा, ज्याने हिंदुस्तानावर २७–२८ वर्षे राज्य केले, त्याचे अंतिमसमयी विचार कसे होते?

मी तुम्हाला इतिहास ऐकवत नसून, केवळ हेच सत्य सांगत आहे की या जगामध्ये येताना मनुष्य रिकाम्या हाती येतो आणि जातानाही रिक्त हस्तेच जातो. अंतिमवेळी तो पस्तावू लागतो, परंतु असा केलेला पश्चाताप त्याच्या उपयोगी पडत नाही. महात्मा आपणांस सांगतात:

तख्त जिन्हां दा चुकण परियां, उड्डन विच हवाई चढ़ियां, मिट्टी विच मिलाए सू।

असे चैन व भोगविलास करणारे लोक मातीमध्ये विलीन होतात, त्यांना अंतिमवेळी स्वत:च्या दुष्कर्मांचा पश्चाताप होतो. गुरू नानकदेवजी सांगतात, ''आपण सांसारिक लोकांना परमात्म्याकडे काय मागावे हे देखील समजत नाही की आपण कोणती गोष्ट प्राप्त केली पाहिजे?'' सर्व महात्मांनी या संसारास दु:खांची नगरी म्हणून संबोधलेले आहे की या जगात कुणीही सुखी मनुष्य नजरेस पडत नाही. हे सत्य आहे की एक अंध मनुष्य, इतर अंधांना मार्ग दर्शवित आहे. हा विचारही आपणांस गैरमार्गावर नेणारा आहे:

ऐह जग मिट्ठा अगला किन डिट्ठा।

महात्मा आपणांस सांगतात की आपण कोणत्या वस्तूचा शोध घेतला पाहिजे? कोणती वस्तू प्राप्त केली पाहिजे? सर्वप्रथम आपण परिपूर्ण सतगुरूंचा शोध घ्यावा, त्यांच्याकडे नामाचे दान मागावे कारण नामाशिवाय आपण ज्या काही सांसारिक वस्तूंची मागणी करतो, त्या सर्व वस्तूंमागे खूप मोठे दु:ख दडलेले असते. तुम्हांस सतगुरू भेटल्यास तुम्ही त्यांच्यावर निर्मळ अंत:करणाने प्रेम करा, ते जे काही काम सांगतात, ते तुम्ही करा.

माझा स्वानुभव आहे की सेवकाने सतगुरूंच्या सांगण्यानुरूप काम केले, तर सतगुरू अन्यायी नसतात, ते आपल्या अंतर्यातच बसलेले आहेत, ते आपले अंत:करण जाणतात. ते आम्हा मार्गावरून भटकलेल्यांना योग्य मार्गावर आणतात. कबीर साहेब सांगतात, ''ज्या मनुष्याच्या मुखातून निद्रावस्थेत देखील सतगुरूंचे नाम बाहेर पडते, अशा मनुष्याच्या पायात माझ्या शरीराच्या चामड्याची चप्पल बनवून घातली, तर मला अतिशय आनंद होईल.''

गुरूंची कदर, नामाची कदर फक्त महान आत्म्यांनाच असते. जे अंतर्यात जातात केवळ तेच जाणतात की नामारूपी धन किती महान आहे? तुमच्या समोर दादु साहेबांची लहानशी वाणी सादर केली जात आहे. या वाणीमध्ये दादू साहेब अतिशय प्रेमाने सांगतात, ''हे परमात्मा! मी तुमच्याकडून संतोष आणि सत्याची मागणी करीत आहे. या जगातील कोणत्याही वस्तूची मला गरज नाही, मला तुझीच गरज आहे.''

मी एक गोष्ट सांगत असतो की एक राजा, दुसऱ्या प्रदेशामध्ये गेला असता मागे त्याच्या राण्यांच्या अंतर्मनात राजाप्रती प्रेम जागृत झाले. प्रत्येक राणीने राजास पत्राद्वारे वा इतर मार्गांनी निरोप पाठविला की आमच्या साज-श्रृंगारासाठी अमुक-अमुक वस्तू येताना घेऊन या. राजाची अशीही एक राणी होती, जिचा राजा अवमान करीत असे, इतर राण्या तिला वेडी समजत असत. त्या राणीने राजास पत्र लिहिले, हे पतीदेव! मला इतर कोणत्याही वस्तूंची गरज नाही. मला गरज आहे ती केवळ तुमचीच.

इतर राण्यांनी जे-जे सामान मागविले होते, ते-ते सामान राजाने परतल्यावर राण्यांच्या महालामध्ये पोहचविण्याची व्यवस्था केली. परंतु ज्या राणीने राजाची मागणी केली होती, त्या राणीच्या महालामध्ये जाऊन राजा स्वत: बसला. इतर राण्यांना त्यांनी मागविलेली एक-एक वस्तू मिळाली, परंतु पती प्रेमास मात्र त्या मुकल्या. जेथे राजा स्वत: जाऊन बसला, तेथे पतीसुख होते तसेच इतर कोणत्याही वस्तूंची कमतरता नव्हती.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''तुम्हाला एखादे कपाट तयार करवून घ्यावयाचे असल्यास, त्यासाठी जर तुम्हांस दररोज सुताराच्या घरी फेऱ्या माराव्या लागल्या, तर तुमचा किती वेळ वाया जाईल? परंतु त्याऐवजी तुम्ही सुतारास प्रेमाने आपलेसे करून, त्यास तुम्ही तुमच्याच घरी आणले तर, त्याच्याकडून तुम्ही हवे ते तयार करवून घेऊ शकाल.'' याचप्रमाणे आपण आपल्या गुरूंकडे गुरूंचीच मागणी केली, तर आपणांस कोणत्याही वस्तूंचा तुटवडा भासणार नाही. गुरू आपली सर्व विपुलता घेऊन आपल्या अंतर्यात प्रस्थापित होतात व आपल्या सर्व गरजांची आपूर्ती करतात.

साईं सत संतोख दे, भाव भगत बिश्वास।
सिदक सबूरी साँच दे, माँगे दादू दास।।

दादूसाहेब सतगुरूंसमोर प्रार्थना करीत म्हणत आहेत, ''तू मला संतोष, चिकाटी आणि धैर्य दे. मला तुझे भक्तीरूपी प्रेम दे.'' आपण एखादे काम जेव्हा प्रेमपूर्वक करतो, तेव्हा त्याचे आपणांस ओझे वाटत नाही.

जीवत माटी ह्वै रहो, साईं सनमुख होय।
दादू पहले मरि रहो, पीछे मरे सब कोय।।

दादूसाहेब सांगत आहेत, ''सर्वांना एके दिवशी मृत्यू येणारच आहे, तर मग आपण जिवंतपणीच त्या मृत्युशी संघर्ष का करू नये? गुरूंच्या दर्शनासाठी जाताना आपण स्वत:स मातीच्या मोलाप्रमाणे बनवावे. असे समजावे की मी स्वत: श्वासही घेऊ शकत नाही. सतगुरू सर्वांचे अंत:करण जाणतात.''

हे एक सत्य आहे की मला महाराज कृपालजींच्या जीवनचरित्राविषयी काहीच माहिती नव्हती. मी त्यांना कधीही विचारले नाही की ते विवाहित आहेत वा नाहीत, त्यांना मुले आहेत वा नाहीत, त्यांची जात कोणती आहे? माझे त्यांच्यावर प्रेम होते, विश्वास होता व माझ्यात संयम व चिकाटी होती. मी आयुष्यभर परिपूर्ण सतगुरूंची मागणी परमात्म्यापुढे करीत होतो. ते दयेचा सागर होते. त्या सागरात प्रेमाची लाट निर्माण झाली व ते स्वत: माझ्या तप्त आत्म्याची क्षुधा-शांती करण्यासाठी माझ्याकडे आले. माझ्या आश्रमामध्ये त्यांना प्रश्न विचारण्यासाठी देखील अनेक माणसे आली होती. महाराजजींनी अतिशय प्रेमपूर्वक त्यांना ही गोष्ट सांगितली:

एका गावाबाहेर जंगलात एक पडिक विहीर होती. एक पांथस्थ त्या विहीरीत पडला. तेथून एक वाटसरू जात होता. त्याने विहीरीमध्ये पडलेल्या माणसाकडे पाहून विचार केला! हा एक मनुष्यच आहे तेव्हा मी याची मदत करावयास हवी. त्याने विहीरीमध्ये रस्सी सोडली व त्या मनुष्यास म्हणाला, ''ही रस्सी घट्ट पकड, मी तुला वरती खेचून घेतो.'' विहीरीमध्ये पडलेल्या मनुष्याने त्यास प्रश्न विचारण्यास सुरूवात केली, ''ही विहीर कधी तयार केली गेली? हिला कोणी बनविले? या विहीरीमध्ये मी का पडलो? या विहीरीमध्ये किती माणसे मावू शकतील?'' विहीरी बाहेर उभा असलेला मनुष्य त्यास म्हणाला, ''अगोदर तू विहीरीबाहेर ये, मग तू मला हवे तेवढे प्रश्न विचार!'' परंतु त्या मनुष्याने ऐकले नाही, प्रश्न विचारतच राहिला.

शेवटी विहीरीबाहेर असलेला मनुष्य रस्सी सोडून देत म्हणाला या विहीरीमध्ये तुझ्यासारखे अनेकजण मावू शकतील. विहीरीमध्ये पडलेला मनुष्य जर समजूतदार असता, तर सर्व प्रथम तो विहीरीबाहेर आला असता व त्यानंतर त्याला हवे ते प्रश्न विचारू शकला असता.

आपली देखील अशीच अवस्था आहे. प्रश्नोत्तरे करण्याऐवजी आपण ध्यान–अभ्यास करावयास हवा आणि सतगुरूंच्या सांगण्यानुसार आपण आपले आचार आणि विचार पवित्र करावयास हवे. आपल्या अंतर्यात शब्दरूपाने बसलेले सतगुरू अन्यायी नाहीत. गुरू–प्रेमात आपली झालेली अवस्था पाहून ते नक्कीच द्वार उघडतील.

दादू दावा दूर कर, निरदावे दिन काट।
केते सौदा करि गये, पंसारी के हाट।।

आपण या जगामध्ये जन्मास आलेलो आहोत, तर आपणांस विचार करणे अत्यावश्यक आहे की परमात्म्याने आपणांस मनुष्यजन्म का दिला? याचा सद्उपयोग आपणांस कसा करता येईल? दादूसाहेब सांगत आहेत, ''येथे मोठ–मोठे राजे–महाराजे–हुकूमशहा जन्मास आले, ज्यांच्या मुखातून बाहेर पडलेला शब्द, जनतेसाठी कायद्याचे स्वरूप धारण करीत असे, परंतु हे सर्व रथी–महारथी देखील या जगातून निघून गेले, त्यांची साधी निशाणीही मागे उरलेली नाही.'' कबीर साहेब सांगत आहेत:

यह तन कागज की पुड़िया बूँद पड़त गल जाओगे।
कहत कबीर सुनों भई साधो ईक नाम बिना पछताओंगे।।

माती मळत–मळत एक कुंभार मातीची भांडी बनवित होता. त्यास माती म्हणते तू तो दिवसही नजरेसमोर आण, ज्यादिवशी तुला मी माझ्यामध्ये समावून घेणार आहे.

माटी कहे कुम्हार को तू क्या रोंदे मोहे।
ईक दिन ऐसा आएगा मैं रौंदूगी तोहे।।

दादू दादा आदि का, निरदावा कैसा।
दिल की दुरमति दूर कर, सौदा कर ऐसा।।

दादूसाहेब सांगत आहेत, ''या जगामध्ये अभिमान करण्यालायक जर कोणती गोष्ट असेल, तर ती आहे परमात्म्याची भक्ती, परमात्म्याप्रती प्रेम. आपले अंत:करण निर्मळ ठेवा, त्यामध्ये कुणाही प्रती घृणा निर्माण करू नका. कुणाही बद्दल वाईट चिंतू नये, कारण सर्वांच्या अंतर्यात परमात्मा वास करीत आहे.

नहीं तहां से सब हुआ, फिर नाहीं हो जाय।
दादू नाहीं हो रहो, साहिब से लौ लाय।।

आपण सांगत आहात, ''तुला कल्पनाही नाही की तुझा श्वासोच्छ्वास कधी थांबेल?कधी तुझ्या परिचितांना टेलिफोन वा तारेद्वारे कळविले जाईल की अमूक व्यक्ती हे जग सोडून गेली आहे. त्यामुळे जोपर्यंत तुझा श्वासोच्छ्वास चालू आहे तोपर्यंत तू परमात्म्याची भक्ती कर, परमात्म्याशी तू समरस हो.''

उपजै बिनसै गुन धरै, यह माया का रूप।
दादू देखत थिर नहीं, छिन छाया छिन धूप।।

दादूसाहेब एक उदाहरण देत आहेत,''तू दररोज पाहतोस की वृक्षाची छाया एके ठिकाणी कधीच स्थीर राहत नाही. जेथे सावली असते तेथे थोड्या वेळाने ऊन येते. तुम्ही परिचितांना पाहता की जो जन्मास येतो, तो हे जग सोडून नक्कीच जातो. आपण स्मशानात जातो, आप–आपल्या रिती–रिवाजांनुसार मृतदेहाचा शेवट करतो. कोणी मृत शरीर कबरीमध्ये दफन करतो, तर कोणी ते लाकडांच्या मदतीने जाळतो. हे सर्व पाहूनही आपल्या लक्षात घेत नाही की आपणांसही मृत्यू येणार आहे. आपण म्हणतो की मृत्यू इतर लोकांसाठी असून, आपल्यासाठी ऐषो–आराम आणि मद्य–मांस आहे.''

एकदा गुरू नानकदेवजी महाराज स्मशानभूमीमध्ये गेले. तेथील उपस्थित लोकांपैकी एकजण म्हणाला की महाराज! एखादी चांगली गोष्ट सांगा जिचा अंत:करणावर चांगला परिणाम होईल. तेव्हा गुरू नानकदेवजी म्हणाले:

जागो जागो सुत्तयो चलया बणजारा।

तुम्ही जागृत व्हा आणि पहा! तुमचा एक साथीदार या जगातून निघून गेला आहे. महात्मा रविदासजी महाराज परमसंत होते. ते म्हणतात:

जो दिन आवे सो दिन जाही, करना कूच रहन थिर नाहीं।

सज्जनहो, जो जन्मास आलेला आहे, तो कधी ना कधी नक्कीच मरण पावणार आहे. कोणताही मनुष्य अमर नाही, मग तो गरीब असो वा श्रीमंत, स्त्री असो वा पुरुष, राजा असो वा प्रजा असो.

बिपति भली गुरु संग में, काया कसौटी दुख।।
नाम बिना किस काम के, दादू संपति सुख।।

दादू साहेब सांगत आहेत, ''संत-सतगुरूंच्या सान्निध्यामध्ये शरीरास कितीही हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या तरी त्या स्वर्गसुखापेक्षा कमी नाहीत. नामा शिवाय तुमच्याकडे सर्व जगातील धन-संपत्ती आणि सर्व सुखे जरी असतील, तरीही ते काय कामाचे? कारण या जगातून आपल्या सोबत जाणारी वस्तू म्हणजे केवळ नामच आहे. या जगातील सर्व सामान आणि आपला देह, आपणांस येथेच सोडून द्यावा लागेल.'' गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

बन नामे को संग न साथी, मुक्ते नाम ध्यामणया।

क्या मुख ले हँस बोलिये, दादू दीजै रोय।
जनम अमोलक आपना, चला अकारथ खोय।।

दादू साहेब सांगत आहेत, ''आम्ही काय बोलावे? जगाची अवस्था पाहून रडूच येते कारण आपण विषय-विकार भोगतो, ज्यांमुळे आपणांस

दु:ख आणि वेदना सहन कराव्या लागतात. आपण आपल्या जन्माची कदर करीत नाही. तो व्यर्थ घालवून येथून निघून जातो. त्यापेक्षा रडणेच चांगले आहे.'' स्वामीजी महाराज सांगत आहेत:

अपने जीव की दया पा लो चौरासी का फेर बचा लो।

नाम जपून, जीवनाचे पावित्र्य राखून आपण काही इतर कुणावर मेहरबानी करीत नसतो. हे करून आपण आपल्याच जीवावर दया करीत असतो.

दादू दयालजींनी अत्यंत प्रेमाने आपणांस समजावले की परमात्माकडून आपण काय मागावे? कोणत्या गोष्टीचा संग्रह करावयास हवा, आपल्या सोबत कोणती वस्तू जाणार आहे? ती वस्तू नाम आहे, गुरू प्रेम आहे. त्यामुळे आपले देखील कर्तव्य आहे की आपण गुरू प्रेम प्राप्त करावे, ध्यान–अभ्यास करावा व आपले जीवन पवित्र बनवावे.

***

प्रश्नोत्तर

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी एस, राजस्थान

एक प्रेमी: *महाराजजी! नकली गुरू त्यांच्या शिष्यांना ज्योत देऊ शकतात का? नकली गुरूंद्वारे दिलेली ज्योत आणि असली गुरूंनी दिलेल्या ज्योतीमध्ये काही फरक असतो का?*

बाबाजी: होय बंधुंनों! अशा प्रश्नांची उत्तरे तुम्हांला मिस्टर ओबेरॉय यांनी लिहिलेल्या पुस्तकामध्ये आढळतील. हे पुस्तक इंग्रजी भाषेमध्ये आहे. या प्रश्नाचा उत्तर देण्याचा आज मी प्रयत्न करीन.

मिस्टर ओबेरॉयने महाराज सावन सिंहजींकडून नाम घेतलेले आहे. तो व महाराज कृपालजी यांचे मुळगाव एकच आहे. तो महाराज कृपालजींचा विशेष सचिव होता, तसेच महाराज कृपालजींना तो स्वत:च्या मुलांपेक्षाही अधिक प्रिय होता. हे पुस्तक तीन विभागांमध्ये लिहिलेले आहे. पहिला भाग, 'बुक ऑफ सावन', दुसरा भाग 'बुक ऑफ संत कृपाल' आणि तिसरा भाग 'बुक ऑफ संत अजायब' असा आहे.

प्रेमीने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला बुक ऑफ अजायब सिंह या भागामध्ये देखील सापडेल. त्यात तुम्हांस नकली गुरूंबद्दल खूप माहिती मिळेल की नकली गुरूंना काळ कशाप्रकारे वेदनामय शिक्षा देतो. हे पुस्तक लिहिण्यासाठी ओबेरॉयने खूप मेहनत केली आहे.

आज तुम्हाला मी आणखी स्पष्ट खुलासा करून सांगतो की, ज्याप्रमाणे चांगले-वाईट हे विश्वाच्या निर्मितीपासूनच चालत आलेले आहे, जन्म-मृत्यू मनुष्यामध्येच आहे, त्याचप्रमाणे असली आणि नकली अशा दोन्ही ज्योती मनुष्याच्या अंतर्यातच आहेत. असली वस्तूची नक्कल केवळ आजच नाही, तर जेव्हापासून विश्वाची निर्मिती झालेली आहे, तेव्हापासूनच होत आलेली

आहे. तुम्हाला हे मान्यच असेल की, आपणांस जन्म देणारा देव तसेच मृत्यू देणारा देवही आपल्या अंतर्यातच आहे. काळाने सतपुरुषाची अतिशय कठोर व खडतर तपश्चर्या केली. भंवर गुफेच्या खालील ही मंडळे आणि आत्मा, ही सर्व काळाचीच रचना आहे.

माझा स्वानुभव आहे की ज्यांनी स्वमेहनतीने धन कमावलेले असते, ते धन ती लोकं अतिशय विचारपूर्वक खर्च करतात. त्यांच्या स्नानगृहामध्ये जाऊन तुम्ही पाहिल्यास, तेथे तुम्हांला एखादा साबण आढळेल, कोणतीही खास सुवासिक प्रकारची तेलं सापडणार नाहीत. ज्यांच्याकडे हरामाचा पैसा आलेला असतो, त्यांच्या स्नानगृहामध्ये चांगले फर्निचर आढळेल, अनेक प्रकारची तेलं आणि साबणं आढळतील. त्यामध्ये स्नान करणारा मनुष्यही विशेषच असतो.

याचप्रमाणे काळाने एकदा सत्तर युगे तर दुसऱ्यांना चौसष्ठ युगे सतपुरुषाची भक्ती केली. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

गुप्ते बूझे जुग चेतारे।

हा देखील केवळ एक अंदाजच आहे. कदाचित काळाने याहूनही अधिक भक्ती केली असावी. आपण मेहनतीने कमावलेला पैसा अतिशय काळजीपूर्वक खर्च करतो व हरामखोरीने कमावलेला पैसा बेपर्वाईने खर्च करतो. याचप्रकारे काळाने अतिशय मेहनत करून भक्तीमध्ये अनेक युगे व्यतीत केली. ज्याने आत्मे मिळविण्यासाठी एवढी मेहनत केली, त्याने ते आत्मे आपल्या ताब्यामध्ये ठेवण्यासाठी देखील खूप मेहनत केलेली आहे. जेवढ्या प्रकारच्या ज्योती आणि नाद सत्पुरुषाने आपल्या शरीरात ठेवलेले आहेत, तेवढ्याच ज्योती आणि शब्दाचे नाद काळाने आपल्या शरीरात ठेवले आहेत.

या देहामध्ये सहा चक्र आहेत. पहिले गुदा चक्र असून जेथे गणेशाचे राज्य आहे, तेथे पृथ्वी तत्त्व आहे. दुसरे इंद्रिय चक्र असून त्यावर ब्रह्माचे राज्य आहे, जो सर्व जगाचा रचयिता आहे. येथे जल तत्त्व आहे. तिसरे

नाभी चक्र असून, येथील मालक विष्णु आहे. येथे अग्नी तत्त्व आहे. चौथे हृदय चक्र असून तेथे शिव आणि पार्वतीचे राज्य आहे. शिव प्राणांच्या भांडाराचा मालक आहे. येथील तत्त्व वायु आहे. पाचवे कंठ चक्र असून येथे शक्ती देवतेचे राज्य आहे. सहावे आज्ञा चक्र आहे, येथे मन आणि आत्म्याचे आसन आहे. हे आसन आपल्या दोन्ही नेत्रांच्या मधोमध आहे. या सर्व चक्रांच्या निरनिराळ्या ज्योती, निरनिराळे आवाज आहेत.

सत्याची मागणी करणारे कमी गिऱ्हाईके असतात. सामान्य जीव धक्के खाणारेच असतात. जेथे जास्त गर्दी आणि मजबूत पार्टी पाहतात, त्यांनाच ते खरे गुरू मानतात. पलटू साहेबांनीदेखील सांगितले होते:

जिसके साथ दस-बीस तिसका नाम महन्त।

महाराज कृपाल सांगत असत की जर खूप गर्दी जमली तर हा काही तो महात्मा परिपूर्ण असल्याचा पुरावा होऊ शकत नाही. सामान्यपणे एखाद्या ठिकाणी लाखों लोकांची गर्दी पाहतो तेव्हा आपण म्हणतो की, येथे काहीतरी आहे. महाराज कृपाल सांगत असत, ''तुम्ही हे पाहू नका की कोणत्या शाळेत जास्त विद्यार्थी जातात. तुम्ही हे पहा की कोणत्या शाळेतील जास्त विद्यार्थी उत्तीर्ण होतात.

हिंदुस्तानामध्ये परमेश्वराच्या नावाने खूप आश्रम, मठ चालविले जातात, जेथील राहणीमान स्वर्गाप्रमाणे आहे. पश्चिमेकडील लोकांना तेथे सर्व प्रकारच्या सुख-सुविधा पुरविल्या जातात. कॅनॉट प्लेस येथे फिरत असलेल्या एखाद्या इंग्रजास पकडून, त्याच्या सोबत फोटो काढून प्रचार केला जातो, हे पहा! पश्चिमेकडील लोकं देखील आम्हांस मानतात. ज्या मनुष्यास सहा महिने चांगले अंथरूण, चांगले जेवण आणि कामासाठी चार नोकर मिळतील, त्या मनुष्याचे काही वेळ हात जोडून बसण्यामध्ये काय नुकसान आहे?

तुम्हांला कल्पना आहे की येथे कोणत्याही प्रकारची काहीही सुविधा उपलब्ध नाही. आपण शहराच्या जवळ नाही, तर दुरवर जंगलामध्ये बसलेलो

आहोत. दहा दिवसांपेक्षा अधिक काळ येथे कोणीही राहू शकत नाही. परवानगी शिवाय येथे कोणी आल्यास, त्याला ताबडतोब मी माघारी पाठवितो. पश्चिमेहूनही अशी अनेकजणं येतात, ज्यांना फुकटचे अन्न खाण्याची सवय जडलेली असते. ते मला उदाहरण देतात की, अमुक मठामध्ये मला सहा महिने राहू दिले. मी त्यांना सांगतो, बंधु! तू तेथे आणखीन सहा महिने जाऊन रहा. जेव्हा व्याकूळ आत्मा परमात्म्यास हाक मारतो, तेव्हा नियम असा आहे की परमात्मा त्यास भरकटवीत नाही, आपोआपच त्यास योग्य ठिकाणी तो घेऊन येतो.

परमपिता कृपाल सांगत असत,''हा निसर्गाचा नियम आहे की भुकेलेल्यास अन्न आणि तहानलेल्यास पाणी नक्की मिळते.'' आपण निर्मळ बनून परमात्म्याचा शोध घेतल्यास, निर्मळ अंत:करणाने रात्रं-दिवस त्याच्या आठवणीत तळमळल्यास तो स्वत:च आपल्या जवळ येईल वा आपणांस त्याच्याकडे बोलावून घेईल. तो आपणांस चूकीच्या मार्गी जाऊ देणार नाही. परमात्म्यास आपली खूप काळजी असते. तो ज्या देहात कार्यरत असतो, त्या देहास अशा आत्म्यांची सर्व चिंता सोपविलेली असते.

थिअरी समजावण्यामध्ये नकली गुरू अतिशय हुशार असतात. नकली गुरूंना अधिक पोषाख घालून ढोंग रचण्याची गरज असते. सत्यास सजविण्याची गरजच नसते. नकली गुरूंकडे गेलो असता ते थिअरी समजावून ध्यानात बसवितात, तेव्हा काळ खालील चक्रांचा ध्वनी ऐकवितो.

त्रियापदापासून भंवर गुफेपर्यंत, प्रत्येक मंडळामध्ये काळाने आत्म्यांच्या नाड्या लपविलेल्या आहेत. विशेषत: महाशून्य देशात तर अनेक नाड्या लपविल्या आहेत. महाशून्यातून केवळ परिपूर्ण गुरूच आत्म्यास पार करवू शकतात. परिपूर्ण गुरूच काळाकडून आत्म्याच्या नाड्या स्वत:च्या ताब्यात घेऊ शकतात. जो तिथपर्यंत पोहचूच शकत नाही, तो काळाकडून आत्म्याच्या नाड्या कशा काय ताब्यात घेऊ शकेल? थोडी फार जरी ज्योती तुम्ही पाहिली असेल तर त्याने काय मोठा फरक पडणार आहे?

कबीर साहेब, गुरू नानकदेवजी महाराजांपासून आजपर्यंतच्या सर्व संतांचा इतिहास तुम्ही वाचून पहा! त्यांनी किती-किती वर्षे मेहनत केली, तेव्हा त्यांना त्यांच्या सतगुरूंची कृपा प्राप्त करण्यामध्ये यश लाभले. आज ज्यांचे स्वर्गाप्रमाणे सजलेले मोठ-मोठे मठ आहेत, त्यांच्या संचालकांनी कधीही मांडी घालून ध्यान-अभ्यास केलेला नाही.

हिंदुस्थानची फाळणी होण्या पूर्वी लाहोर येथे गुंगा पहिलवान नांवाचा प्रसिद्ध पहिलवान होऊन गेला. तो रात्र-रात्रभर जागून व्यायाम करीत असे. त्या पहिलवानाचे उदाहरण महाराज कृपाल देत असत की मेहनत करूनच तो जगामध्ये प्रसिद्ध झाला. ध्यान-अभ्यास करण्यासाठी महाराज कृपालजींनी रावी नदीची निवड केली होती. निद्रा येऊ नये म्हणून ते पाण्यामध्ये उभे राहून ध्यान-अभ्यास करीत असत. एकदा परमपिता कृपाल रात्रीच्या वेळी ध्यान-अभ्यासासाठी रावी नदीवर जात असताना,एका शिपायाने त्यांना विचारले, ''यावेळी तुम्ही कोठे जात आहात?'' त्यावर महाराजजींनी उत्तर दिले, ''मी ध्यान-अभ्यासासाठी जात आहे, तू देखील माझ्याबरोबर चल.'' त्या शिपायाने उत्तर दिले, ''ते काम तुमच्यासाठीच योग्य आहे.''

प्रेमी नाम मिळाल्यानंतर जेव्हा मला पत्र लिहून कळवितात की अमुक तारखेस मला नाम मिळाले आहे, तेव्हा आनंदाने मी पत्र लिहितो की आता तुझे कर्तव्य आहे की मेहनत करून, अंतर्यामध्ये जाऊन तू स्वत: सत्याचा अनुभव घे. सतगुरूंच्या प्रेमसागरामध्ये बुडी मारून नामाचा मोती तू मिळव. येथे मेहनतीचा माझा अर्थ असा आहे की आपल्या मुलांनीच स्वत: सत्याचा अनुभव घ्यावा. मी खात्रीने सांगतो की तुम्ही अंतर्यामध्ये जा, तेथील मार्ग एखाद्या पुस्तकाप्रमाणे उघडेल. अंतर्यात जर तुम्हास सतगुरू भेटले नाहीत, तर तुम्ही येऊन मला पकडू शकता.

माझ्या आयुष्यात मी स्वत: अनुभवलेले आहे. बाबा बिशनदासजींनी सांगितलेला दोन-शब्दांचा अभ्यास मी सतरा वर्षे केला. मी सांगत असतो

की संतमतामधील सुरवातीचा अभ्यास अतिशय कठीण असतो. त्यानंतर एवढा त्रास होत नाही, कारण मार्ग उघडलेला असतो. परमपिता कृपालजींनीही माझ्या नेत्रांवर त्यांचा हात ठेवत मला म्हटले, मुला! अंतर्यामध्ये पहा.

उद्या तुम्हाला ते ठिकाण पाहण्याची संधी मिळेल. येथे देखील ध्यान–अभ्यास करण्यामध्ये मी चार–पाच वर्षे व्यतीत केलेली आहेत. जुन्या माणसांनी ही जागा अगोदरही पाहिलेली आहे. ज्या लोकांनी माझ्यासोबत पंचवीस–तीस वर्षे व्यतीत केलेली आहेत, त्यांना आजही मी आवाहन करीत विचारतो की त्यांच्यापैकी कोणीही मला शहरांमध्ये भटकताना पाहिले आहे का? कुणी मला चविष्ट अन्न ग्रहण करताना पाहिले आहे का? कुणी मला अन्नास नांव ठेवताना पाहिले आहे का?

सामान्य सत्संगींना आवाहनपूर्वक मी सांगत आहे की जे लोकं आज गुरूपणाचे काम करीत आहेत आणि असा दावा करीत आहेत की, असली गुरू आहेत, त्यांनी मला वेळ द्यावा वा माझ्याकडून वेळ घ्यावा. अंतर्यामध्ये मी त्यांना दाखवू शकतो की नकली गुरूंची अवस्था कशी होते? महाराज कृपाल जेव्हा मला म्हणाले, की दिल्लीला चल आणि तू आश्रम सांभाळ, तेव्हा मी त्यांना म्हणालो, ''आयुष्यभर मी तुमचा शोध घेत राहिलो आणि भेटल्यावर तुम्ही मला विटाच देत आहात. मला विटांचा काय उपयोग? मला तुमची गरज आहे. तुम्हाला भेटून मी आनंदी आहे.'' त्यावेळी माझ्या आश्रमामध्ये विटांचा खूप मोठा ढिग रचलेला होता.

माझ्या सतगुरूंनी इतर कुणाच्याही शेतातले अन्न ग्रहण केले नव्हते. त्यांनी माझ्या मेहनतीचे गहू आणि येथील गाईंच्या दुधापासून बनलेले तूप खाल्ले. महाराजजी नेहमी सत्संगांमध्ये सांगत असत की माझ्या आजू–बाजूस गोचीडे आहेत. ते असेही सांगत की प्रत्येकजण असाच विचार करीत असे की याची पगडी कधी मला माझ्या डोक्यावर घालावयास मिळेल? माझा या गोष्टींवर विश्वास नव्हता, परंतु जेव्हा अनेक नकली गुरू निर्माण होऊ लागले, तेव्हा मला पटले की महाराज कृपाल बरोबर बोलत होते.

महाराज कृपालजींनी शरीर सोडल्यानंतर मी माझी दिन:श्चर्या अशी बनवली की रात्रं-दिवस मी माझ्या खोलीतच राहत असे. सर्व लोकं रात्री निद्राधि झाल्यानंतर रात्री आठ ते नऊ वाजेपर्यंत तासभर मी खोलीबाहेर पडत असे. मी खोलीला बाहेरून टाळे लावण्यास सांगितले होते. सुरवाती-सुरवातीला प्रेमी लोकांपासून लपून बाहेर निघून जात असे. अनेक महिने मी किल्लयांवाली या गावांमध्ये मुक्काम केला होता. मी कोठून आलो आहे? याचा गांवातील लोकांना काहीच थांगपत्ता नव्हता. तेथे माझ्या राहण्याचा परिणाम असा झाला की तेथील लोकांना महाराज कृपालजींचा सुगंध येऊ लागला; ते संपूर्ण गाव सत्संगींचे गांव बनले.

माझा शोध घेण्यासाठी पाठीने खूप मेहनत घेतली. मला येथे परत आणल्यानंतर मी माझी दिन:श्चर्या अशी केली की मी कुणाला भेटतच नसे. खोलीमध्ये जीवन व्यतीत करीत राहिलो. तुमच्या देशातील डॉक्टर मौलिनो, जो आता तुमच्यामध्येच बसलेला आहे, त्यास तुम्ही विचारू शकता की त्याने मला दिल्ली अथवा अमेरिकेमध्ये पाहिले होते का? मी ना दिल्ली ना अमेरिका ना कॅनडा येथे गेलो. मी तर जमिनीखाली माझे जीवन व्यतीत करीत होतो. याच्या अंत:करणात खरे प्रेम जागृत झाल्यानंतर त्याने त्याच्या अंतर्यामध्ये शोधले. परमात्मा कृपालजींनी यास सांगितले की मी येथे कार्यरत आहे आणि मला तू कसे भेटावेस?

तुम्ही रसल पर्किन्सला विचारा की त्याने किती मेहनत घेतली? तो अतिशय मेहनतीने माझ्याकडे पोहचला व मला कळकळीची विनंती करून त्याने मला बाहेर आणले. एका बाजूला अशी मंडळी आहेत जे न्यायालयामध्ये जाऊन असा दावा करतात की ते खरे गुरू आहेत. सत्य-असत्याचा निर्णय मी तुमच्यावर सोडतो, तुम्हीच निर्णय घ्या.

रसल पर्किन्स हिंदुस्थानामध्ये आला असता, तो मोठ-मोठ्या मठांमध्ये गेला. तेथील लोकांनी त्याला सर्व प्रकारचे प्रेम, सुखसोई देऊ केल्या, त्यास स्वत:च्या बरोबरीनेही बसविले,परंतु जेव्हा हा अजायब सिंहकडे येऊ लागला,

तेव्हा पन्नास–साठ मैल अगोदरच त्यास निरोप मिळाला की माझ्याकडे कुणीही येऊ नये. रसल पर्किन्सने स्वत:च्या कपाळावर हात मारून म्हटले की हा कसा महात्मा आहे जो म्हणतो माझ्याजवळ कोणी येऊ नये, जेव्हा इतर लोक पश्चिमेकडच्या प्रेमींच्या पायांखाली हात ठेवून त्यांचे स्वागत करण्यास तयार आहेत. ज्यास सत्याची गरज असते, तो सुख–सोई पाहत नाही. तो केवळ सत्यच शोधत असतो.

मी तुम्हांला इतिहासातील एक घटना सांगतो. जेव्हा गुरू हरिकृष्णजींनी सांगितले की माझ्यानंतर बाबा बकाला या गावी महात्मा कार्य करणार आहेत,त्यांच्या परिवारातील सोढ़ी मंडळी बावीस खाटा टाकून बाबा बकाला येथे येऊन बसले. आयुष्यभर तप–त्याग करीत असलेला एकजण अशाच प्रकारची गुहा बनवून बसला होता. त्यास लोकं तेगा कमला म्हणत असत.

त्या बावीस गाद्यांच्या मालकांनी त्यांचे चांगले–चांगले एजंट ठेवले होते, जे लोकांना स्वत:चे खोटे अनुभव वर्णन करून सांगत. मक्खन शाह लुभाणाचे जहाज समुद्रात वादळामुळे बुडावयास लागले असता त्याने गुरू हरिकृष्णजींच्या लंगरमध्ये पाचशे मोहरा देण्याचे वचन दिले. जेव्हा त्यास कळले की गुरू हरिकृष्णजींनी शरीर त्यागले आहे व त्यांनी बाबा बकाला येथे पुढील संत होतील असा इशारा दिलेला आहे, तेव्हा तो बाबा बकाला येथे आला. तेथे बावीस गुरू बसलेले होते. तेथे, ज्या कुणाला तो भेटे, तेव्हा त्याचे एजंट सांगत की हाच खरा गुरू आहे. तो सर्वांसमोर पाच–पाच मोहरा ठेवत गेला. जेणेकरून जो खरा गुरू असेल, तो स्वत:च काहीतरी बोलेल.

दोन स्त्रिया पाणी भरण्यासाठी चाललेल्या होत्या. मक्खन शाह लुभाणाने त्यांना विचारले की सोढी घराण्यात आणखीनही कुणी गुरू आहेत का? त्या स्त्रियांनी उत्तर दिले, आहे तर खरा, परंतु त्यास कुणी मानत नाही. त्यास सर्वजण तेगा कमला असे म्हणतात. गुरू तेग बहादुरजी नेहमीच त्यांच्या जमिनीखालील गुहेमध्ये ध्यान–अभ्यासात दंग असत.

मक्खन शाहने गुरू तेग बहादुर साहेबांसमोरही जाऊन पाच मोहरा ठेवल्या. संत अशी चमत्कारिक गोष्ट करीत नाहीत परंतु कधी-कधी लोकांना सत्य कळावे म्हणून त्यांना तसे करावे लागते. गुरू तेग बहादुरजींनी स्वत:च्या खांद्यावरील वस्त्र बाजूस सारून दाखविले व म्हणाले, ''हे बघ सेवका! तुझे जहाज वाचवताना माझ्या खांद्यास खिळे बोचले आहेत. लंगरमध्ये पाचशे मोहरा देण्याचे वचन देऊन तू आता पाचच मोहरा देत आहेस?'' बस! एवढेच बोलण्याचा अवकाश होता, मक्खण शाह लुभाणा घराच्या छतावर चढून मोठ्याने आरोळी देऊ लागला,''सतगुरू सापडले, सतगुरू सापडले.''

मक्खन शाह लुभाणाने गुरू तेगबहादुरजींना बाहेर आणले. स्टेज तयार करविले, जेणेकरून त्यांनी सत्संग करावा व जनजागृती व्हावी, तसेच नकली गुरूंनी तेथून निघून जावे. सोढी घराण्यातील शिरोमणी प्रमुख धीरमलला हे सहन झाले नाही. त्याने त्याच्या एका सेवकाद्वारे गुरू तेगबहादुरजींवर गोळीबार करविला, परंतु त्यामधून गुरू तेगबहादुरजी वाचले. त्यांच्या इतर नातेवाईकांनी अतिशय विरोध केल्यावर ते आसामच्या दिशेने गेले. नंतर माखोवाल येथे जमीन खरीदी करून तेथे आनंदपूर साहेब वसविले.

गुरू नानकदेवजी महाराज जेव्हा अंगदला म्हणाले की माझ्या अपरोक्ष तू माझे कार्य करायचे आहे, तेव्हा अंगददेवजी दोन्ही हात जोडून उभे राहिले आणि म्हणाले, हे ओझे अतिशय जड आहे. ते उचलणे खूप अवघड आहे. गुरू नानकदेवजींची मुले नाराज झाल्याने, अंतिमसमयी गुरू नानकदेवजींच्या जवळ आली नाहीत, कारण त्यांना गुरू नानकदेवजींनी गुरूपद दिले नव्हते.

महाराज कृपालजींनी महाराज सावन सिंहजींनी देहत्याग केल्यानंतर कोणतेही भांडण केले नाही. ब्यास डेऱ्यातील स्वत:चे घर सोडून ऋषिकेश येथील जंगलामध्ये ते निघून गेले. प्रेमींनी खेचून त्यांना संगतची सेवा करण्यासाठी आणले.

***



सातत्य सतगुरूंच्या आठवणींचे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी
प्रेमींना दिलेला अनमोल संदेश

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी त्यांच्या स्मृतीत बसण्याची आपणांस संधी दिली. सर्व समर्थ कृपालजींच्या चरणी आपण सतत प्रार्थना करावयास हवी की तुम्ही आम्हांस भक्तीचा खजिना सदैव देत रहा आणि तुमच्या भक्तीमध्ये आम्हांस सदा रममाण ठेवा कारण तुम्ही तुमच्यावर भक्तांवर खूप प्रेम करता.

काल कबीर साहेबांनी आपणांस प्रेमाने सांगितले होते की साधुंच्या दर्शनाने आपणांस परमात्म्याची आठवण होते. जो वेळ आपण साधुंच्या संगतीत व्यतीत करतो, त्याची नोंद आपल्या भक्तीच्या हिशोबात होत असते. इतर वेळ वाया गेल्यातच जमा आहे. आपल्या जीवनातील जे क्षण जे दिवस आपण आपल्या प्रिय गुरू परमात्म्याच्या सान्निध्यात व्यतीत करतो, ते क्षण ते दिवस अतिशय मौल्यवान आहेत.

सत्संगाच्या या कार्यक्रमात सहभागी होऊन मी अतिशय प्रसन्न झालो. या कार्यक्रमात अनेक प्रेमींना खूप काही पारमार्थिक लाभ झाला आहे, जो लाभ त्यांनी सांभाळून ठेवावा अशी मी अपेक्षा करतो. जर आपण आपल्या घरी परतल्यानंतरही सातत्याने ध्यान–अभ्यास केला तरच आपण जे काही आपणांस या कार्यक्रमात लाभले आहे त्यास सांभाळून ठेवू शकतो.

मी अमेरिका वा हिंदुस्थानमधील सर्वच सत्संगाच्या कार्यक्रमांमध्ये प्रेमींना नेहमीच प्रिय परमात्मा कृपालजींचे हे उद्‌गार वारंवार सांगतो, ''आपण सत्संगाला जाण्यासाठी आपली शंभर कामे व ध्यान–अभ्यासाला बसण्यासाठी हजार कामे बाजूस ठेवावयास हवी. जोपर्यंत आपण आपल्या आत्म्यास त्याचा आहार देत नाही, तोपर्यंत आपण आपल्या शरीरासही अन्न देऊ नये. ज्याप्रमाणे अन्न आपल्या शरीरास उर्जा देते, त्याचप्रमाणे शब्द–नामाचा अभ्यास हा आत्म्याचा आहार आहे.''

आपणांस कल्पना आहे की आपण एक दिवस जरी अन्न ग्रहण केले नाही, तरी आपले शरीर शक्तीहीन बनते. याचप्रमाणे आपला आत्मा देखील जन्मोजन्मांतरापासून उपवाशी आहे. त्यामुळे आपण जोपर्यंत आत्म्यास ध्यान–अभ्यासाचा आहार देत नाही, तोपर्यंत शरीरासही अन्न देऊ नये.

आज ज्याप्रमाणे देहस्वरूपाने मी तुमच्यापासून दूर जात आहे, त्याचप्रमाणे एकदा माझे प्रिय परमपिता कृपाल देहस्वरूपाने दूर जात असताना मी त्यांच्या समोर खूप अश्रु ढाळले. खरेतर शब्दरूपाने ते नेहमीच माझ्या सोबत होते. ते मला म्हणाले, ''तू का रडतोस? तुला काय वाटते, मी तुझ्यापासून दूर जात आहे? खरेतर तू तेव्हा रडावयास हवे, जेव्हा मी तुझ्या अंतर्यातून दूर जाईन, तुला मदत करणार नाही.'' प्रियजनहो, आतापर्यंत त्यांनी दिलेले वचन ते निभावत आहेत. ते नेहमीच आपणांस मदत करीत आहेत. ते नेहमीच आपल्या अंतर्यात आहेत.

प्रियजनहो, तुम्ही आपआपल्या घरी परतल्यावर असे समजू नका की तुमची जबाबदारी संपली आहे. तुम्ही **सातत्याने सतगुरूंची आठवण** ठेवावी, सातत्याने ध्यान–अभ्यास करावा. तुम्ही जेव्हा श्वास घेता तेव्हा तुमचे नामस्मरण चालू असावे व श्वास सोडतानाही तुमचे नामस्मरण चालूच रहावे.

प्रत्येक श्वासाबरोबर तुम्ही सातत्याने सतगुरूंच्या आठवणीत लीन व्हावे. नामस्मरण करीत तसेच आपल्या सांसारिक जबाबदाऱ्यांची आपूर्ती करीत तुम्ही नियमीत तुमचा ध्यान–अभ्यास करावा, सत्संगात जावे. आपण स्वत:चा सुधार करावा म्हणून परमात्मा कृपालजींनी जी रोजनिशी दिली आहे, ती भरावी. आपण आपले जीवन गुरूंच्या सांगण्यानुसार व्यतीत करावे.

मी परमपिता परमात्मा कृपालजींपुढे प्रार्थना करतो की तुम्हा सर्वांनी आपआपल्या घरी सुरक्षित आणि आनंदाने पोहोचावे व तेथे संगतमध्ये गुरूंच्या प्रेमाचे वाटप करावे.

***

जेव्हा महाराज कृपालजींनी मला नामदान देण्याचा आदेश दिला, तेव्हा मी त्यांना त्यांचे खरे स्वरूप दाखविण्यास सांगितले

हमारे प्यारे सतगुरू जैसा, हमने न कोई और देखा (२)
वे तो महान हैं मेरे सतगुरू (२) उनसा महान न और देखा,(१) हमारे प्यारे...

वे हैं दोनों जहाँ के मालिक, दुनिया के दिल में बसने वाले,
हर घट के ज्ञाता हैं वे ज्ञानी, दिलों की बातें जानने वाले,(२)
शब्द स्वरूप है रूप उनका (२) रूप जो हमने आँखों से देखा, हमारे प्यारे...

देख तो देखने वाला देखे, देखे तो देखता ही रह जाए,
प्यारी मूरत प्यारी सूरत, देखने वाला उनका हो जाए, (२)
मन मोहक मन का भाने वाला (२) मन भावन हम सबने देखा, हमारे प्यारे...

देखा तो शायद हर नजर ने देखा, अपने अपने ख्याल से,
जिसने भी उनको प्यार से देखा, निकला वो इस मझधार से,(२)
वे तो हैं एक महान नाविक (२) भरकर नाव ले जाते देखा, हमारे प्यारे...

वह नाविक गुरु कृपाल है प्यारे, सावन प्यारे का प्यारा,
कृपा का सागर कृपाल है प्यारे, अजायब को जान से भी प्यारा,(२)
वे तो अति सुंदर सलोने (२) उनका हुआ जिसने देखा, हमारे प्यारे...

जेव्हा पहिल्यांदा महाराज कृपालजींनी मला काही लोकांना 'नामदान' देण्यासाठी सांगितले तेव्हा त्यांनी मला त्या लोकांना थियरी समजावण्यास आणि नामस्मरण करवून घेण्यास सांगितले. मी उभा राहून, आपले दोन्ही हात जोडून त्यांच्यापुढे प्रेमपूर्वक विनंती केली की,''हे प्रिय परमात्मा! तुम्ही खरे राजाधिराज आहात, तुमच्या घरी कोणत्याही वस्तुची कमरतरा नाही. तुम्ही या लोकांना उघडपणे तुमचे दर्शन द्यावे. मला माझ्या त्या अनुभवाचा कधीच विसर पडणार नाही, जेव्हा तुम्ही मला उघडपणे तुमचे साक्षात्कारीक दर्शन दिले होते.''

त्या अनुभवाच्या वेळी मी महाराज कृपालजींना विचारले की, बुल्लेशाहांचे गुरू इनायत शाह साक्षात परमेश्वर होते, ते सकल विश्वाचे सर्वे-सर्वा होते. बुल्लेशाहांना हे सर्व माहिती असूनही त्यांनी इनायत शाह यांना सर्वांत मोठे धोकेबाज असे का म्हटले होते?

त्यावेळी थंडीचे दिवस होते, रात्रीचे आठ किंवा नऊ वाजले होते. महाराज कृपाल त्यांच्या खोलीमध्ये रजई पांघरून बसलेले होते. त्यांनी त्यांची रजई दूर सारली. खरे तर त्यावेळी खूप थंडी होती, तरीही मला त्यांच्या शरीरातून उत्सर्जित होणारी उष्णता जाणवत होती. त्यांचे संपूर्ण शरीर तेजोमय झाले होते. त्यांच्या कपाळातून व नेत्रांमधुन तेजस्वी प्रकाश पसरला. तो तेजस्वी प्रकाश इतका प्रखर होता की त्यामुळे संपूर्ण खोली प्रकाशाने दैदिप्यमान झाली होती.

प्रिय गुरू कृपालजींनी मला उत्तर दिले की शिष्य जेव्हा अंतर्यात जातो व आंतरिक सत्य आणि सतगुरूंचे खरे स्वरूप पाहतो, तेव्हा त्यास जाणीव होते की सतगुरू सर्वांत जास्त धोकेबाज आहेत. सतगुरूंचे खरे स्वरूप निराळेच असते व ते आपणांस दुसऱ्याच स्वरूपात नजरेस पडतात. आपण सतगुरूंना बाह्य स्वरूपात आपल्याच प्रमाणे श्वास घेताना, चालता-फिरताना, आजारी पडताना आणि कर्मांची परतफेड करताना पाहतो, परंतु हे सर्व ते इतर लोकांसाठी करत असतात.

जे काही आपण करीत असतो, तेच सर्व काही करत असता आपण त्यांना पाहतो. परंतु आपणांस जसे ते दिसतात आणि भासतात, तसे ते नसतात. सकल विश्वाचे स्वामी असूनही, आपल्यासमोर ते अतिशय सामान्य आणि नम्र बनून राहतात. ते आपणांस सांगतात की मी तुमचा गुरू नसून, तुमचा गुरू 'शब्द' आहे. मी तुम्हाला 'शब्दाशी' जोडले आहे. परंतु वास्तवात ते स्वत:च 'शब्द' आहेत. काय ही आपली फसवणूक नाही का? धोकेबाज लोकं बोलतात एक परंतु त्यांच्या हृदयामध्ये दुसरेच काहीतरी असते. याच

प्रमाणे सतगुरू बाह्य स्वरूपामध्ये आपल्याप्रमाणेच दिसतात, परंतु आंतरिक दृष्ट्या ते तसे नसतात.

राणी इंद्रमती कबीर साहेबजींची भक्त होती. ती देह पातळीवरून वरती जात अंतर्यामधील मंडळांमध्ये गेली असता, तिने पाहिले की कबीर साहेब साक्षात परमेश्वराच्या सिंहासनावर आरूढ झालेले आहेत. कबीर साहेबांच्या चरणी नतमस्तक होत तिने म्हटले, ''हे सर्व तुम्ही मला अगोदरच सांगितले असते, की सकल विश्वाचे कर्ते-करविते तुम्हीच आहात, तर मी ध्यान-अभ्यास आणि इतर अडीअडचणींचा सामना केलाच नसता. मी तेव्हाच तुमच्या चरणी नतमस्तक झाले असते.'' कबीर साहेब म्हणाले, ''मी जर तुला अगोदरच सांगितले असते की सकल सृष्टीचा मी मालक आहे, तर तुझा त्यावर विश्वास बसला नसता. तुला जे काही करायचे आहे, ते सर्व तू आता करू शकतेस.''

जेव्हा तुम्ही अंतर्यात जाऊन सतगुरूंचे असली स्वरूप पाहता तसेच बाहेरही त्यांचे गौरवशाली स्वरूप पाहता, तेव्हा तुम्ही अतिसामान्य व नम्र बनता. सतगुरूंचे असली स्वरूप जेव्हा तुम्ही पाहता, तेव्हा तुम्हांस जाणीव होते की सतगुरू सर्वश्रेष्ठ आणि महान आहेत, ते सकल सृष्टीचे मालक आहेत आणि त्यांच्या रोमा-रोमातून तेजोमय किरणे बाहेर पडत आहेत, ते पाहून तुमच्या अंतरामधून अहंकार आणि मी-मोठेपणा नाहीसा होतो.

ती घटना लक्षात घेऊन मी महाराज कृपालजींना म्हटले, ''महाराजजी, तुम्ही या सर्वांना तुमचे खुले दर्शन का देत नाही? जर तुम्ही उघडपणे तुमचे खरे दर्शन दिल्यास ब्राह्मण आणि मुल्ला यांची आपआपसांमधील वादविवाद नष्ट होऊन सर्वत्र शांतीचा प्रसार होईल. लोकांच्या कपाळावर टिळा लावण्यासाठी ब्राह्मण जे केसर वापरतात त्याचा वापर करणे ते थांबवतील. मुल्ला पहाटे अल्लाहच्या नांवाने लोकांना उठवणे विसरून जातील. गुरूद्वाऱ्यातील भाईंनाही ते काय करीत आहेत याची जाणीव होईल. घरोघरी केवळ

तुमचीच चर्चा होईल. तुम्ही जर सर्व जगावर कृपा करू इच्छित नसाल, तर कमीत–कमी जे लोक यावेळी 'नामदान' घेण्यासाठी आलेले आहेत, त्यांच्यावर तरी कृपा करा.''

त्यावेळी महाराजजी अतिशय गंभीर झाले. ते मला म्हणाले, ''यांच्याकरवी माझे वस्त्रहरण करवून घेऊ नकोस. तू फक्त तेच कर जे करण्यासाठी मी तुला सांगितले आहे.''

***

सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

३१ मार्च ते ०२ एप्रिल २०१७

दिल्ली शहरातील कार्यक्रम

१९, २० व २१ मे २०१७